# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाराष्ट्र शासन प्राधिकृत यु.जी.सी. मान्यताप्राप्त**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित**

**सहायक प्राध्यापक पदासाठी महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)**

सेट विभाग, पुणे विद्यापीठ आयोजित करीत असलेली एकतिसावी सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) **रविवार, दि. ३० ऑगस्ट, २०१५** रोजी आयोजित करण्यात येत आहे. **सदरहू परीक्षा मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, सोलापूर, चंद्रपूर, गडचिरोली, पणजी (गोवा), अहमदनगर व धुळे या केंद्रावर घेण्यात येईल.** विद्यार्थ्यांनी अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (**http://setexam.unipune.ac.in**) उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच भरावयाचा आहे. संकेतस्थळावरील अर्ज दि. **१ जून, २०१५ सकाळी ११.०० वाजल्यापासून दि. २७ जून, २०१५ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** उपलब्ध असतील.

विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील संपूर्ण अर्ज संगणकावर ऑनलाईन पद्धतीने भरावा. अर्जाची छापील प्रत स्वतःकडे जतन करून ठेवावी तसेच सदरची प्रत कोणत्याही परीक्षा केंद्रांवर अथवा सेट विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे पाठवू नये.

## परीक्षा शुल्क

| | | |
|---|---|---|
| १) | खुला | रू. ५५०/- (प्रक्रिया शुल्कासह) |
| २) | इतर मागासवर्गीय/भटक्या व विमुक्त जाती जमाती/<br>विशेष मागासवर्गीय<br>(फक्त उन्नत व प्रगत गटात न मोडणा-या उमेदवारांसाठी)<br>**(For Non-Creamy Layer)**<br>आणि अंध व अपंग प्रवर्ग/अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती | रू. ४५०/- (प्रक्रिया शुल्कासह) |

**टिपः उन्नत व प्रगत गटात न मोडणा-या उमेदारांसाठी वार्षिक उत्पन्नाच्या आर्थिक मर्यादेसंबंधी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा दि. २४ जून, २०१३ व दि. १७ ऑगस्ट, २०१३ चा निर्णय संदर्भासाठी पहावा.**

विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा फी फक्त चलनाद्वारेच एच.डी.एफ.सी. बँक किंवा बँक ऑफ महाराष्ट्रच्या कोणत्याही शाखेत भरावयाची आहे. विद्यार्थ्यांनी अर्जाची छापील प्रत व चलनाची प्रत त्यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे.

शैक्षणिक पात्रता, इतर माहिती व अभ्यासक्रम विद्यापीठाच्या **http://setexam.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**स्वा/-**

**दि.०१/०६/२०१५**

**डॉ. नरेंद्र मा. कडू**
**कुलसचिव तथा सदस्य सचिव (सेट)**